Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.IV/ May; 12pp.1-4
प्रा . कटारे छाया सिध्देश्वर
ISSN:-2230-7850

Research Papers

जैन श्राविकांचा आचारधर्म - एक दृष्टीक्षेप

प्रा . कटारे छाया सिध्देश्वर
एम् . ए . एम् . एड्
सोलापूर विद्यापीठ .

प्रस्तावना :—

भगवान महावीरांच्या शासनात महिला गरिमा वाढविणा-या "श्राविका संस्कृतीला" उदात्त अर्थ आहे . श्रावक म्हणजे आत्महित श्रवण करणारा .

जैन संस्कृतीची परंपरा जशी फार प्राचीन आहे तशीच श्राविका संस्कृतीची आहे . भगवान महावीरांच्या काळात जैन संघाचे चार भेद सांगण्यात आले होते . त्यात मुनी-आर्यिका-श्रावक-श्राविका असे भेद आगमातून ग्रंथित केल्याचे दिसते . श्रावक व श्राविका यातूनच व्रत-महाव्रत धारण करून मुनी व आर्यिका यांची निर्मिती होत असते . त्यातही जेव्हा भगवान महावीरांचा चतुःसंघ निर्माण झाला तेंव्हा त्यात स्त्रियांचा श्राविका संघ होता . त्याचे नेतृत्व चंदना यांच्याकडे होते . संघात स्त्रियांना स्थान असावे असा क्रांतिकारी विचार प्रामुख्याने अस्तित्वात आला . त्या क्रांतीकारी विचारांतूनच "श्राविका संस्कृती" उदयास आली .स्त्रियांना समाजात मानाचे व पवित्रतेचे स्थान देण्यात आले . स्त्री ही केवळ उपभोग्य व रमणीय वस्तू नाही तिलाही धर्म-पालनाचे व आचरणाचे स्वातंत्र्य आहे असा तो विचार होता .

"न स्त्री स्वातंत्र्य अर्हति" हा मनुवादी व पराकोटीचा हीन विचार संपुष्टात आला . त्यामुळे जैन समाजातील स्त्रियांना एक मोठी सामाजिक धार्मिक जबाबदारी स्विकारावी लागली .[1]

जैन स्त्रियांची मानसिकता त्यांची भावनात्मक व आचरणात्मक एकात्मता व विविध जनसमुदायात राहुनही स्वधर्म परिपालनाची उत्सुकता हजारो वर्षे टिकून आहे . जैन समाजातील विवाह संस्था देखील अनेक वैशिष्टयांनी परिपूर्ण आहे . कारण घरात ज्या स्त्रिया येतात त्या वेगवेगळया प्रांतातील जाती-जमातीतील असतात . धर्म जरी एकच जैनधर्म असला तरी आचारात्मक भाषात्मक व संस्कारात्मक भिन्नता असते . पण त्या नव्या घरात रमून जातात . नवे संस्कार स्विकारतात . श्राविका संस्कृतीत हेच तत्व मोठे मनोहारी आहे . भोगापेक्षा त्याग ज्ञानापेक्षा समजुतदारपणा सामंजस्य विवेक हा या श्राविका संस्कृतीचा प्राण आहे . पुरूषी अहंकाराला आपल्या मधुर सोज्वळ आचरणाने प्रेमाने सहकार्याने व एकरूपतेने स्किावकरणारी जैन स्त्री ही या संस्कृतीचे रहस्य आहे .[2]

"जागे सो महावीर" या ग्रंथात श्री . चंद्रप्रभू यांनी अतिशय सुंदर शब्दात श्रावकांची भूमिका स्पष्ट केली आहे . "श्रावक" या शब्दाचा अर्थ श्रध्दापूर्वक विवेकाने किया करणारी किंवा कियाशील असा होतो .[3]

वर्धमान महावीरांच्या मते प्रथम ऐकण्याला महत्व आहे . ऐकल्यानंतर आपण आपला मार्ग निश्चित करतो . त्या मार्गावरून जाणे महत्त्वाचे आहे . मार्गच माहीत नसेल तर तुमचे जाणे निरर्थक आहे . म्हणून विचार करून मार्ग कमण जो करतो तो श्रावक मग तो जैन धर्माचाच असला पाहिजे असे नाही . ज्याचे मनःपुर्वक श्रवण करतो मग आचरण करतो तो श्रावक श्रावकानंतर श्रमण / मुनी त्या मार्गावर चालण्याचे कष्ट घेतो .[4]

वर्धमान महावीरांच्या मते जन्मतः कोणीही श्रावक असत नाही . त्या व्यक्तीला श्रावक जीवन जगावे लागते . ज्याप्रमाणे वेदामध्ये चार वर्ण सांगितले आहेत . ब्राम्हण क्षत्रिय वैश्य व शूद्र . ब्राम्हण कुळात जन्मलेल्या ब्राम्हण नसून त्याचे आचार विचार उच्चार आहार विहार उच्च कोटीचे आहेत . ज्याला अध्ययन अध्यापन करता येते तो ब्राम्हण . मग तो कोणत्याही वर्णात किंवा कुळात जन्माला आला तरी तो ब्राम्हणच म्हणजेच व्यक्तीच्या अंगच्या गुणांवरून व त्याच्या कर्मावरून त्याचा वर्ण ठरवला जाई . त्याप्रमाणेच जैन धर्मात श्रावक जन्माला येत नाही तर तो त्याग व भोगाचा योग्य समन्वय साधून मोक्षाप्रत जातो . त्याला श्रावक म्हणावे . श्रावक जीवन आचाराचं लागतं . काही व्यक्ती **70-80** वर्षाचे झाले तरी श्रावक होऊ शकत नाहीत मात्र एखादा **3** वर्षाचा बालक हा श्रावक होऊशकतो . हे त्याच्या आचारणावरून निश्चीत करता येईल .[5]

अध्यात्मशास्त्रात ज्याप्रमाणे ज्ञानरहित कर्मकांडाना निरर्थक म्हंटले आहे . त्याचप्रमाणे आचारधर्महीन ज्ञानाला केवळ ज्ञानाच्या पोपटपंचीला देखील निरर्थक म्हंटले आहे . धर्माचे मुळ वीज सम्यकदर्शन यथार्थ तत्वज्ञान हे आहे . तथापि "चरितं खलू धम्मो" ते तत्वज्ञान आचारसहीत असेल तरच त्याला धर्म म्हंटले आहे . धर्माचा प्रारंभ चारित्र्याशिवाय व आचारधर्माशिवाय होत नाही .[6]

जैन धर्मामध्ये प्रथम स्थान मुनींना असल्यामुळे त्यांच्या आचारसंहीतेचा विचार केला . आता दुसरा दर्जा गृहस्थांना आहे . म्हणून त्यांच्या संबंधी येथे विचार केलेला आहे . श्रावकांच्या आचाराविषयी जैन साहित्य विपुल प्रमाणात आहे . काळ जसा परिवर्तीत होत गेला तसा त्यांच्या आचाराविचारांत फरक होत गेला . याचे मुळ आचार्यांच्या "चरित्र्यापाहूड" या ग्रंथात दिसते .[7]

मनुष्य स्वच्छंदी असंमयी जीवन घालवून नरक यातना भोगण्यापेक्षा व्रत नियम दया दान पूजा आदि व्यवहार धर्माचे यथोचित पालन करून पुण्य संपादन करून संसारातील जीवन सुगती सुखामध्ये व्यतीत करावे व परंपरेने

भविष्यकाळी मोक्षसुखाची प्राप्ती करून घ्यावी हाच एकमेव श्रावकाचा आचारधर्म आहे . मुमुक्षु हा नेहमी मोक्षाच्या पाय-या चढण्यास तत्पर असतो .[8]

श्रावकांच्या आचार धर्मावरोबरच त्यांची दिनचर्याही वैशिष्टयपूर्ण आहे . गृहस्थाने दररोज पहाटे उठावे बोटे मोजत मंत्रपठण करावे . नंतर त्याने स्वतःला विचारावे मी कोण? माझा धर्म कोणता? मी काय करावे? खाय करू नये? असा त्यांचा दिनकम आरंभ होतो . यामुळे आपले जीवन तो अधिक जागरूकतेने जगू शकतो .

जैनांमध्ये याप्रकारची कमवध्द वागणूक वालपणापासूनच शिकविण्यात येते . त्यामुळे शिक्षित वालक अजागरूक किंवा वेजवावदार होत नाही . त्याच्या देहाला मनाच्या पाठीमागून जाण्याचे शिक्षण दिले जाते . मन देहाच्या पाठीमागून नव्हे .[9]

श्रावकांच्या आचारात 6 आवश्यक किया सांगितल्या आहेत . आपण नित्यनियमाने काही किया करत असतो जसे स्नना, भोजन, मलसूत्र विसर्जन, विश्रांती या आवश्यक किया आहेत . असेच धर्ममार्गात श्रावकाला 6 किया आवश्यक आहेत . राम पांडव रावण आदी महान राजेसुध्दा या सहा धर्म कियांचे तंतोतंत पालन करीत होते .

त्या सहा किया पुढीलप्रमाणे 1) देवपुजा 2) गुरूपास्ती 3) स्वाध्याय 4) संयम 5) तप 6) त्याग (दान)[10]

सहा आवश्यक कियामधील स्वाध्याय याला "परमतप" म्हंटले आहे . स्वाध्यायामध्ये स्वतःचे अध्ययन होते . धर्ममार्ग व धर्मकिया समजावून घेण्यासाठी श्रावकांनी सतत जीनवाणीचे वाचन, मनन, चिंतन केले पाहिजे . स्वाध्यायामुळे दुर्गतीचा नाश होतो कर्माची निर्जरा होते ज्ञानवृध्दी होते स्वाध्याय केल्यामुळे स्वतःची आत्मिक ओळख होते मनःशांती मिळते .[11]

यावरून असा निष्कर्ष काढता येईल की समाज निर्माण करण्यात स्त्रियांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे . जैन धर्मामध्ये गृहस्थीला "श्राविका" म्हणतात . तिच्यासाठी वेगळे आचारधर्म सांगितलेले नाहीत . मात्र श्रावकांच्या आचारधर्म पालनात श्राविकांचा सहभाग मोठा असतो . जैनमुनी जेंव्हा गृहस्थांकडे जेवायला येतात . तेंव्हा जे घर स्वच्छ व पवित्र आहे तेथेच ते भोजन घेतात . म्हणजेच घर स्वच्छ ठेवणे त्याचे पावित्र्य राखणे भोजन तयार करणे पाणी गाळून देणे ही कामे स्त्रियांनाच करावी लागतात . यावरून जैनमुनींच्या आचार धर्मपालनात स्त्रियांचा सिंहाचा वाटा आहे .

जैन धर्म प्राचीन असला तरी स्त्रियांना श्रेष्ठ मानलेले आहे . श्राविकांनी जैन धर्म वृध्दींगत केला व त्याचा विकास केला असता तरी त्यांच्या आचारधर्मावर अधिकृत व्यक्तींनी लिहिलेले ग्रंथ माझ्या वाचण्यात आलेला नाही . प्रत्येक कर्तृत्ववान पुरूषांमागे स्त्रियांचा हात असतो असे म्हणतात . त्याप्रमाणे धर्मउभरणीमध्ये स्त्रियांचा हात असतो असे म्हणतात . त्याप्रमाणे धर्म उभरणीमध्ये स्त्रियांचा किती मोठा सहभाग आहे हे श्राविकांनी दाखवून दिलेले आहे . "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती सारे जग उध्दारी" या उक्तीप्रमाणे पुरूषांना जन्म देणारी स्त्री ही त्यांच्यावर संस्कारही करते . या सुसंस्कारीत मुलांतूनच समाजाची धर्माची निर्मिती होते . म्हणूनच गुरूनानकांनी म्हंटले आहे "स्त्री ही सृष्टीचा मूलाधार आहे ."

जैन धर्म हा प्राचीन धर्म आहे . अल्पसंख्यांक असला तरी आचारणाच्या वावतीत मात्र तो सर्वश्रेष्ठ आहे . यात तीळमात्र शंका नाही आजच्या काळात धकाधकीच्या जीवनात या आचारधर्माचे तंतोतंत पालन करणे अवघड होऊन वसलेले आहे . नोकरी करणा-या स्त्रिया छोटी-छोटी घरे घरापासून लांव असलेली मंदिरे उच्छृंखलपणा दाखविणारी प्रसारमाध्यमे स्पर्धा यामुळे वेळच मिळत नाही . असा सूर ऐकायला येतो . तरीही स्वयंपाक करताना मंत्र पठण केलं तर भोजन करणा-यांच्या वृत्तीत वदल होऊशकतो हे तरी सध्या स्त्रियांच्या हातात आहे .

संदर्भ सूची ः

1 . व्र . शहा विद्युलता विद्युत मंथन श्राविका प्रकाशन **2009** पृ . क . **81**
2 . कित्ता पृ . क . **83**
3 . श्री . चंद्रप्रभ जागे सो महावीर जित्यशा फाउंडेशन कोलकत्ता **2003** पृ . क . **133** .
4 . कित्ता पृ . क . **133** .
5 . कित्ता पृ . क . **159**
6 . शहा सुमतीवाई पुर्णार्घ्य पी . एस . विद्यापीठ ट्रस्ट **1999** पृ . क . **628** .
7 . कित्ता पृ . क . **640** .
8 . सौ . गोसावी विजया जैन धर्माची ओळख सुमेरू प्रकाशन डोविंवली **2009** पृ . क . **43** .
9 . डॉ . खडवडी वी . के . ; जैनधर्म विमल प्रकाशन मिरज **2000** पृ . क . **19** .
10 . श्री . गोपाळकर संजय आदिनाथ धर्मपरिचय हिरालाल गांधी प्रकाशक **2000** पृ . क . **7** .
11 . कित्ता पृ . क . **8** .